# सुजाता मेली न्हाय!

Genre: Drama | Duration: 120 minutes | Story/Screenplay/Dialogue: Pralhad Jadhav

### One line:

मुंबईत एका टॉवरच्या बांधकामावर असणाऱ्या एका मजुराची; सुजाता नावाची आठ वर्षे वयाची मुलगी अचानक नाहीशी होते. शेजारच्या बिल्डिंगमध्ये राहणारी सोशलवर्कर अंजली सुजाताचा शोध घेऊन तिला न्याय मिळवून देण्यासाठी धडपड करू लागते. त्यासाठी तिला पोलीस-यंत्रणा, न्यायव्यवस्था आणि सत्ताधाऱ्यांशी कसा संघर्ष करावा लागतो,त्यात ती यशस्वी होते का, सुजाताचे पुढे काय होते,याची रहस्यरंजक, प्रेरक आणि अभूतपूर्व कहाणी!

### Synopsis:

मराठवाड्यात दुष्काळ पडल्यामुळे मोतीराम आणि माया हे मजूर दांपत्य सुजाता या त्यांच्या एकुलत्या एक मुलीसह मुंबईत येते. तेथे त्यांना एका टॉवरच्या बांधकामावर मजुरी मिळते. टॉवरच्या परिसरातच मोतीराम एक छोटी शेड उभारून वॉचमन कम मजूर म्हणून काम करू लागतो. मायाही तेथेच पडेल ती मजुरी करत आपल्या संसाराला हातभार लावू लागते. टॉवरच्या शेजारी सुयोग नावाच्या इमारतीत अंजली ही सोशल-वर्कर तिच्या पत्रकार वडिलांसह राहत असते. अंजलीचे या मजूर कुटुंबाशी आपलेपणाचे नाते निर्माण झालेले असते. तिला सुजाताविषयी खूप प्रेम  असते.ती सुजाताला बाजूच्या महानगरपालिकेच्या शाळेत दुसरी इयत्तेत ॲडमिशन मिळवून देते. सुजाताला शिकवून मोठी करावी असे तिच्या आई-वडिलांचे स्वप्न असतेच त्याला कळत-नकळत अंजलीचा पाठिंबा असतो. एक दिवस अचानक सुजाता नाहीशी होते. तिला शोधून काढण्याची कामगिरी एका आंतरिक प्रेरणेने अंजली आपल्या हाती घेते...अन्यायाच्या विरोधात अनेक लढाया लढलेले तिचे पत्रकार वडील तिच्यामागे खंबीरपणे उभे राहतात, आणि मग सुरू होतोय का अनोख्या शोधाचा प्रवास! पोलीस, न्याययंत्रणा आणि सत्ताधारी यांच्याशी अंजलीचा निकराचा संघर्ष सुरू होतो. सुजाताच्या या शोधाच्या निमित्ताने भ्रष्ट सरकारी यंत्रणा, ढोंगी राजकारणी आणि विविधांगानी पोखरलेला समाज यांचे खरे स्वरूप पुढे येऊ लागते. बांधकाम प्रकल्पातील मुकादम, कॉन्ट्रॅक्टर, इंजिनीयर, आर्किटेक्ट, बिल्डर तसेच नगरसेवक, आमदार, मंत्री, मुख्यमंत्री या साऱ्या दुष्टचक्राचा भेद करत अंजली अंतिम सत्यापर्यंत पोहोचते; इतकेच नाही तर सर्वंकष मानवी कल्याणाच्या निष्कर्षापर्यंत जाऊन पोहोचते...पुरुषप्रधान संस्कृतीच्या अंधाऱ्या पार्श्वभूमीवर स्त्रीचा सन्मान आणि तिच्या आत्मप्रतिष्ठेचे दर्शन घडवणारा हा प्रत्ययकारी प्रवास— सुजाता मेली न्हाय!

***

(ही कथा, पटकथा आणि संवाद ‘स्क्रीन रायटर्स असोसिएशनकडे’ नोंदण्यात आले असून सर्व हक्क लेखकाकडे राखीव आहेत.)

नोंदणीचा तपशील :

SWA Membership Number : 56663

Type of Creation : Screenplay
Title of Creation : Sujata Meli Nhaay
Date : Friday 2023-07-21 12:18:49
Transa. ID : 1689921940-1154601508
Reference Number : 11294672611

***